पोलीस अधीक्षक, कार्यालय, पालघर.
जिल्हा मुख्यालय, कोळगाव, पालघर
दुरध्वनी — ०२५२५ - २५११००
E-mail: - sp. palghar@mahapolice.gmail.com

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

## प्रेसनोट क्र. ५४ दिनांक ०३/१०/२०२२

# सायकल चोरी करणा-या आरोपींना अटक करुन एकूण १३ गिअर्स, नॉन गिअर्स सायकली हस्तगत करण्यात सफाळा पोलीसांना यश.

दि.१६/०९/२०२२ रोजी फिर्यादी सौ. अनिता प्रशांत भालेराव, रा.माकणे, पो. उंबरपाडा, ता. जि. पालघर यांची देवभुमी कॉम्प्लेक्स सफाळा येथुन १६,०००/-रुपये किंमतीची हिरो कॅम्पस् कंपनीची सायकल अज्ञात चोरट्याने चोरुन नेलेबाबत दिलेल्या फिर्यादीवरुन सफाळा पोलीस ठाणे गु.र.नं. I ९६/२०२२, भादंविसं कलम ३७९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेऊन सपोनि/संदिप कहाळे, प्रभारी अधिकारी सफाळा पोलीस ठाणे यांनी पोलीस तपास पथक नेमले. सदर नेमलेल्या पोलीस पथकाने गुप्त बातमीदारांकडून व कौशल्यपुर्ण तपास करुन १) आरोपी वय-२० वर्षे, रा.बोईसर, ता.जि.पालघर व २) आरोपी वय १९ वर्षे, रा. बोईसर, ता. जि. पालघर, ३) महिला आरोपी वय ३५ वर्षे, रा. बोईसर ४) विधीसंघर्ष बालक असे एकूण ०४ संशयीत आरोपी यांना चौकशीकामी ताब्यात घेतले. सदर आरोपीत यांची कसून चौकशी केली असता त्यांनी वर नमुद गुन्हा केल्याचे कबुल केले आहे. तसेच पालघर व सफाळा परीसरातून एकूण १३ विविध कंपनीच्या सायकली चोरी केल्याचे कबुल केले आहे.

आरोपींनी खालील प्रमाणे गुन्हे केल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

| अ.क्र. | पोलीस ठाणे | गुन्हा. रजि. नं. व कलम |
|---|---|---|
| ०१ | सफाळा पोलीस ठाणे | गुन्हा. रजि.क्र. I ९५/२०२२, भादंविसं कलम ३७९ |
| ०२ | सफाळा पोलीस ठाणे | गुन्हा. रजि.क्र. I ९६/२०२२, भादंविसं कलम ३७९ |
| ०३ | पालघर पोलीस ठाणे | गुन्हा. रजि.क्र. I २९८/२०२२, भादंविसं कलम ३७९ |

आरोपीत यांना अटक केले असून त्यांचेकडून एकूण १,२८,०००/- किंमतीच्या १३ विविध कंपनीच्या सायकली हस्तगत केल्या आहेत. पालघर शहर व परीसर, सफाळे, केळवे या भागातील ज्या कोणी नागरीकांच्या सायकली चोरी झाल्या असतील त्यांनी सफाळा पोलीस ठाणेशी संपर्क साधावा.

सदरची कारवाई श्री. बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक पालघर, श्री. प्रकाश गायकवाड, अपर पोलीस अधीक्षक पालघर, श्रीमती निता पाडवी, उपविभागीय पोलीस अधिकारी पालघर, पोनि/अनिल विभुते, प्रभारी अधिकारी स्थागुशा पालघर यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि/संदिप कहाळे, प्रभारी अधिकारी सफाळा पोलीस ठाणे, मपोउपनिरी/रिजवाना ककेरी, मपोउपनिरी/प्राजक्ता पाटील, पोउपनिरी/बेलकर, पोहवा/आत्माराम बोरसे, पोना/कल्पेश केणी, पोना/वैभव सातपुते, पोना/नारायण धोंगडे, पोना/अनंता खोत, पोना/भरत भावर, पोशि/शिवाजी चिमकर सर्व नेमणूक सफाळा पोलीस ठाणे यांनी केलेली आहे.


सफाळा पोलीस ठाणे
जिल्हा पालघर
पो. ठाणे फोन नं:०२५२५-२३०२५५, मो.नं:८६६९६०४०३७